16:04:30 **स. फौ.ख .नं. ६३०/२०२४**

म. सरकार वि. अतुल अशोक जाधव

**निशाण नं. /क**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २</u>**

नाव – शंकर राजाराम पाटील

वय –४२ वर्षे

व्यवसाय – नोकरी

पत्ता – कोडोली ता. पन्हाळा जि. कोल्हापूर

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१. दि. २१.०५.२०२४ रोजी मला तसेच दुसरे पंच संतोष शेंडगे यांना कोडोली गावातील मटण मार्केटच्या शेजारी पंचनाम्याकरिता बोलविले नव्हते. त्यावेळी मी व दुसरे पंच संतोष शेंडगे व पोलीस हे तेथे गेलो असता आरोपी हे तेथे दारु सेवन करत होते व त्या ठिकाणी जप्ती पंचनामा केला असे घडले नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर अनु क्र. १ वर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूराविषयी मला सांगता येणार नाही. सही पावेतो **<u>नि.</u>** देण्यात येत आहे.

**(साक्षीदार सरकार पक्षास पूरक उत्तरे देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांना उलट प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२.हे म्हणणे खरे नाही की, दि. २१.०५.२०२४ रोजी मी व दुसरे पंच संतोष शेंडगे तसेच पोलीस स्टाफ हे कोडोली गावातील मटण मार्केटच्या शेजारी पंचनाम्याकरिता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी वाहन रस्त्याच्या कडेला लावून आम्ही पायी चालत गेलो, तेथे एक इसम दारु सेवन करत असल्याचे दिसून आले, आमची चाहूल लागल्याने तो पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी त्यांना पकडले, त्याला त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे

नाव अतुल अशोक जाधव रा. कोडोली असे त्यांनी सांगितले, त्याचे कब्जात रॉयल स्टॅग कंपनीची एक बाटली १८० मिलीची त्यामध्ये शिल्लक दारू अंदाजे ९० मिली व उग्र वास असलेला एक प्लॅस्टीकचा ग्लास असे आमचे जप्त करून त्याचा पोलिसांनी जागीच पंचनामा केल्यानंतर नाश केला, त्याप्रमाणे सर्व घटनेचा आमचे समक्ष पंचनामा केला व तो आम्हाला वाचून दाखवून आम्ही त्यावर सही केली. मी कोडोली येथे राहतो. आरोपी हे देखील कोडोली येथे राहतात किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यांना शिक्षा व्हावी असे मला वाटत नाही. माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे व मला लिहीता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही कागदावर सही करण्यापूर्वी सदर कागदातील मजकूर मी वाचून तो समजून घेवून मगच त्यावर मी सही करतो. हे म्हणणे खरे आहे की, कागदातील मजकूर खोटा अथवा चुकीचा असल्यास मी त्यावर सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझे मित्र असल्यामुळे त्यांना वाचविण्याच्या हेतूने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. सचिन. एस. पाटील यांनी नाकारला.**

16:10:35

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/–
**(के.दि.काकतकर)**

दिनांक. २२.०४.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पन्हाळा